## महाराष्ट्रातील कृषी उत्पादन वाढीसाठी इस्त्राइली तंत्रज्ञानाचा मोठा सहभाग - एकनाथ खडसे

## -जळगाव येथे केळी पिकासाठी सेंटर ऑफ एक्सलन्स सुरु करण्याची कृषी मंत्री एकनाथ खडसे यांची इस्त्राइलच्या कृषी मंत्र्यांकडे मागणी

**मुंबई, दि. ७** : महाराष्ट्रात संत्रा, हापूस, केशर, डांळिब गुणवत्ता केंद्राची स्थापना करुन इस्त्राईली तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उत्पादन वाढीसाठी राज्यातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होत आहे. हे तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी इस्त्राइलच्या कृषी मंत्रालयाचा मोठा सहभाग आहे, असे प्रतिपादन कृषी मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज विधानसभेत केले.

इस्त्राइलचे कृषी मंत्री युरी ॲरियल हे शिष्टमंडळासह महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले असून आज दुपारी या शिष्टमंडळाने कृषी मंत्री श्री. खडसे यांची भेट घेतली. या शिष्टमंडळाने विधानसभेच्या गॅलरीत उपस्थित राहून कामकाज पाहिले.

या संदर्भात श्री. खडसे यांनी विधानसभेत निवेदन केले. ते म्हणाले की, इस्त्राइल कृषी मंत्रालयातील १५ वरिष्ठ अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ महाराष्ट्र भेटीवर आले आहे. भारत आणि इस्त्राइल देशात कृषी विकासासाठी अनेक सामंजस्य करार झाले असून राज्यातील शेतकऱ्यांना इस्त्राइल तंत्रज्ञानाद्वारे कृषी उत्पादनात वाढ, पाणी बचत, फलोत्पादन, काढणी पश्चात तंत्रज्ञान इत्यादी सोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. याबद्दल इस्त्राइलच्या कृषी मंत्रालयाचे मी आभार व्यक्त करतो.

भविष्यात सुध्दा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना इस्त्राइली तंत्रज्ञानाद्वारे विविध सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी इस्त्राइलचे कृषी मंत्री व त्यांच्या समवेत आलेले अधिकारी व शास्त्रज्ञ प्रयत्नशील राहतील, असेही श्री. खडसे यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान, इस्त्राइलचे कृषी मंत्री युरी यांच्यासह त्यांच्या पत्नी ह्यागीत ह्याकोहेन तसेच इस्त्राइलचे वाणिज्य दूत डेविड अकोव्ह यांच्या शिष्टमंडळाने राज्याचे कृषी मंत्री एकनाथ खडसे यांची विधानभवनातील दालनात भेट घेतली. यावेळी श्री. खडसे यांनी शाल, श्रीफळ देऊन श्री. युरी यांचा सत्कार केला.

यावेळी श्री. खडसे म्हणाले की, महाराष्ट्रातील फार मोठा भाग पर्जन्यखाली असून येथील वातावरण इस्त्राइलच्या दक्षिण भागातील नेगेव वाळवंटासारखे

आहे. इस्त्राइल सरकारच्या मदतीने महाराष्ट्रात चार ठिकाणी सेंटर्स ऑफ एक्सलन्सची स्थापना करण्यात आली आहे. याबद्दल इस्त्राइल सरकारचे मी आभार मानतो. हे चारही सेंटर्स राज्यात तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करण्यास उपयुक्त ठरले आहे. जळगाव जिल्हा केळी उत्पादनासाठी प्रसिध्द असून त्यादृष्टीने जळगाव येथे इस्त्राइल सरकारच्या मदतीने केळी पिकासंदर्भात सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन केल्यास उपयुक्त ठरेल. राज्यातील शेतकरी कृषी विषयक प्रशिक्षणासाठी इस्त्राइलला भेटी देत असतात. हा कार्यक्रम खाजगी संस्थेमार्फत हाताळला जातो, त्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण व भेट हा कार्यक्रम खाजगी पर्यटक संस्थेऐवजी महाराष्ट्र व इस्त्राइल यांच्यात उभयपक्षी करार झाल्यास ते सोयीचे होईल, असेही श्री. खडसे यांनी यावेळी सांगितले.

इस्त्राइलचे कृषी मंत्री श्री. युरी यावेळी म्हणाले की, जळगाव येथे केळी पिकासंदर्भात सेंटर ऑफ एक्सलन्स सुरु करण्यासंदर्भात प्रयत्न करण्यात येतील. भविष्यातही महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राला इस्त्राइल तंत्रज्ञानाचे सहकार्य करण्यात येईल, असे सांगून श्री. युरी यांनी श्री. खडसे यांना गुढी पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी राज्याचे कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव डी. के. जैन उपस्थित होते.
........